# मेट्रो - २ साठी लागणारे सिसर क्रॉसओव्हर मुंबईत दाखल

■ मुंबई

दहिसर ते डीएन नगर मेट्रो २ अ प्रकल्पासाठीचे सिसर क्रॉसओव्हर साइटवर दाखल झाले आहेत. सिसर क्रॉसओव्हर लवकरच लावण्याच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. जुलैमध्ये हे रूळ लावण्याचे काम पूर्ण होईल.



या सिसर क्रॉसओव्हरचा उपयोग मेट्रो गाड्यांचा मार्ग बदलण्यासाठी केला जातो. सिसर क्रॉसओव्हर ही एक विशिष्ठ पद्धतीची मार्ग रचना आहे. त्यानुसार हे सिसर क्रॉसओव्हर चारकोप मेट्रो आगारकडे जाणाऱ्या उताराच्या भागात लावण्यात येणार असल्याची माहिती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने दिली आहे.हरियाणा येथील सोनिपतमधील मे. व्ही.ए.इ.-व्ही.के.एन. या भारतीय कंपनीने या सिसर क्रॉसओव्हरचे उत्पादन केले आहे.